पाटबंधारे प्रकल्पांच्या जलाशयात पिण्याचे पाणी आरक्षित करण्यासाठी जिल्हास्तरीय समितीची पुनर्रचना करण्याबाबत - महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण आदेशानुसार सुधारणा.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्रमांक :- संकीर्ण-२०१८/(७२ /१८)/ सिं.व्य.(धो)
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक : १७.०२.२०१८

<u>संदर्भ:</u> १) शासन निर्णय क्र. संकिर्ण १००३/(३१०/०३)/सिंव्य (धोरण), दि. १० ऑगस्ट,२००४
२) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण आदेश क्र.०९/१७, दि.२२/९/२०१७

<u>प्रस्तावना</u> :-

उपरोक्त संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयान्वये पाटबंधारे प्रकल्पांच्या जलाशयातील पिण्याचे पाणी राखून ठेवण्याबाबतचा विचार करुन निर्णय घेण्यासाठी व पाणीपट्टीची वसूली करण्यासाठी जिल्हयाचे पालकमंत्री यांचे अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात आली आहे. तसेच सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्र. २.१ व २.२ मध्ये पिण्याचे पाणी आरक्षणाचे मापदंड नमूद करण्यात आले आहेत.

तथापि, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ मधील तरतूदीनुसार व त्यानंतर महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम २००५ यात सुधारणा करण्याकरीता अधिनियम २०११ मधील कलम ११ (क) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन नदी खोरे अभिकरणाद्वारे पिण्याच्या व औद्योगिक वापरासाठी भूपृष्ठावरील पाणी हक्कदारीचे वितरणाबाबतचे निकष निश्चितीचे आदेश महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने संदर्भ क्र. २ च्या आदेशांनुसार निर्गमित करण्यात केले आहेत. सदर निकषांनुसार संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयामध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

पाटबंधारे प्रकल्पांच्या जलाशयातील पिण्याचे पाणी आरक्षित करण्यासाठी जिल्हास्तरीय समितीची पुनर्रचना करण्याबाबतचा शासन निर्णय क्र.संकीर्ण १००३/(३१०/०३)/सिंव्य (धो) दिनांक १० ऑगस्ट, २००४ मधील परिच्छेद क्र. २.१ व २.२ मधील नमूद पाणी आरक्षणाबाबतच्या मापदंडाऐवजी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाचा आदेश क्र. ९/२०१७, दिनांक २२ सप्टेंबर, २०१७ मधील तरतूदी/निकष/मापदंडानुसार पाण्याची गरज परिगणित करण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२१७१६४१५७३१२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Atul Ashok Kapole

Digitally signed by Atul Ashok Kapole
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=797fcfe0bb4a86dd814129f50d05c1d249ea6f0acc364c6214f11ff7174bd5ef, serialNumber=ae2c4f4c985d3e984de94324901263d48766ec651dea49d652faf11a96aa98b5, cn=Atul Ashok Kapole
Date: 2018.02.17 16:45:55 +05'30'

(अ.अ.कपोले)

शासनाचे उप सचिव

प्रति :-

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. अध्यक्ष/उपाध्यक्ष, विधानसभा, विधानभवन, मुंबई.
४. मा. सभापती/उपसभापती, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
५. मा. विरोधी पक्षनेते, विधानसभा, मुंबई यांचे कार्यालय, विधानभवन, मुंबई.
६. मा. विरोधी पक्षनेते, विधानपरिषद, मुंबई यांचे कार्यालय, विधानभवन, मुंबई.
७. सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव.
८. सर्व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
९. मुख्य सचिव यांचे उपसचिव, मंत्रालय, मुंबई
१०. प्रधान सचिव (महसूल व वन) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
१३. प्रधान सचिव (जलसंपदा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. सचिव (जसंव्य व लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५. सचिव, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई.
१६. कार्यकारी संचालक, पाटबंधारे विकास महामंडळ (सर्व)
१६. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
१७. मुख्य अभियंता (पा) व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७. मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, (सर्व)
१८. अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग (सर्व)
१९. निवडनस्ती कार्यासन सिंव्य (धोरण)